महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक:-तंशिस/शैवि/महाडिबीटी/२०२२-२३/ 3770 दिनांक:- 06 DEC 2023

प्रति,
प्राचार्य /संचालक,
सोबत जोडलेल्या यादीतील संस्था,
नागपूर विभाग , नागपूर

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ मधील २nd Installement अंतर्गत संस्थांच्या लॉगीन ला प्रलंबित असलेले अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबत.**

संदर्भ:- १) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस / शैवि / महाडिबीटी / २०२२-२३ /३२६८ दि नां क – १७ / १० / २०२३
२) या कार्यालयाचे पृष्ठ क्र. तंशिस / शैवि / महाडिबीटी / २०२२-२३ /३५४३ दि नां क – ०७ / ११/ २०२३
३) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस / शैवि / महाडिबीटी / २०२३-२४ /३६६३ दि नां क – २४ / ११/ २०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत की, आपल्या संस्थेतील सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत महाडिबीटी पोर्टल वरील राबविण्यात येणा –या योजनांतर्गत शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यात आलेला अर्ज मंजूर झालेले असून सदर शिष्यवृत्ती पहीला हप्ता थेट विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या बॅक खात्यात जमा झालेला आहे. **परंतु , यादीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ मधील खालील योजनांतर्गत पात्र विद्यार्थ्यांना प्राप्त होणारा शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता (२nd Installement) अंतर्गत प्रलंबित तसेच वेळोवेळी लॉगीन ला प्राप्त होणारे विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबत पत्राव्दारे तसेच व्हॉस्टअॅप ग्रुप व्दारे आपणास वारंवार कळविण्यात आलेले आहे. परंतु सदर शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्यात आलेले नसल्याचे संचालनालयामार्फत कळविण्यात आलेले आहे.**

तरी, पुन:श्च या पत्राव्दारे यादीतील संस्थांना सुचित करण्यात येते की, सदर विद्यार्थ्यांला लाभाचा दुसरा हप्ता **(२nd Installement)** मंजूर करण्यासाठी आपल्या लॉगीन मध्ये **खालील योजनांतर्गत प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांची** , क्लर्क लॉगीन मधून व त्यानंतर प्राचार्यांच्या लॉगीन आयडीव्दारे उपस्थिती (Student Attendance) भरुन वरीष्ठ कार्यालयास ऑनलाईन पाठविण्यांत यावी. जेणे करुन संबंधित विद्यार्थ्यांना प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीचा दुसरा हप्त्याचा लाभ घेता येईल. उपरोक्त न केलेल्या कार्यवाहीमुळे विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती पासून वंचित राहील्यास, सर्वस्वी जबाबदारी प्राचार्याची राहील, याची संस्था प्रमुखानी /प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना

( डॉ. मनोज भा. डायगव्हाणे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

सहपत्र:- संस्थानिहाय विद्यार्थ्यांची यादी
( soft copy)